MHKO050014652022

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १३६/२०२२ मधील**
**निशाणी ४० वरील आदेश**
**सौ. जयश्री दिलीप वीर वगैरे**
**विरुध्द**
**श्री. सुरेश मारुतराव जाधव वगैरे**

वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे मुळ दावेत दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

२. सदर अर्जाद्वारे वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल केलेनंतर यातील प्रतिवादी नं.४ यांनी दावा मिळकत १अ मध्ये अतिक्रमण करुन बेकायदेशिरपणे व अनाधिकाराणे बांधकाम पुर्ण केले आहे. त्यामुळे सदर दाव्यामध्ये या अर्जात नमुद केलेप्रामणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे व तशी परवानगी वादीस मिळणे आवश्यक आहे.

३. सदर अर्जावर नि.४१ कडे प्रतिवादी नं.४ यांनी म्हणणे दाखल केले आहे की, सदरचा अर्ज साधनी व अभिलाषी बुध्दीचा असुन खरा नसल्याने मान्य व कबुल नाही. सदर अर्जाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. प्रतिवादी यांचे मार्फत दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे हे अर्जातील विधान खोटे व चुकीचे आहे. प्रतिवादी नं.४ याने इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडुन परवाना मिळवुन कायदेशिर बांधकाम केलेले आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती दाव्यात मागता येणार नाही. दाव्याची आकारणी पुर्णतः चुकीची व कायदयाविरुध्द आहे. सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती त्यांनी केली.

४. अभिलेखावरील दस्तऐवजांची अवलोकन केले. प्रतिवादी नं.४ यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे. इतर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही.

५. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाई ताकीद होऊन मिळणेसाठी व आज्ञार्थी आदेश होवुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर दावा हा प्राथमिक स्टेजला असुन सदर दाव्यामध्ये अद्याप पुरावा होणे बाकी आहे. त्यामुळे सदर प्रकरणात या अर्जामध्ये मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी दिलेस दाव्याच्या

स्वरुपात बदल होणार नाही. सदर अर्जात वादीने मागणी केली आहे की, यातील प्रतिवादी नं. ४ यांनी अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे. प्रतिवादी नं.४ यांना सदर बाब मान्य नाही. परंतु दावा हा वादीचा असल्याने कायदयाप्रमाणे दावा व दाव्यातील कथन शाबीत करणे ही जबाबदारी देखील वादीची आहे. दाव्यात अद्याप दोन्ही बाजुचा पुरावा सुरु होणे बाकी आहे. तसेच सदर दाव्यात मुद्दे निश्चित झालेले नसुन प्रतिवादी नं.७ ला समन्स पाठवण्याकरिता सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती केल्याने दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे-

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जामध्ये मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती नियमाप्रमाणे १४ दिवसांच्या आत करावी.

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2025.04.03 17:16:57 +0530

ठिकाण - इचलकरंजी. (एम.एम.चौधरी)
दिनांक - ०३/०४/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी